दैनिक
dailyloknisht@gmail.com
# लोकनिष्ठ
LOK NISHT
संपादक - युनुस खान
कार्यकारी संपादक - अमजद खान
● दैनिक ● छ.संभाजीनगर ● वर्ष-४ ● अंक - १७९ ● शनिवार दि. २८ नोव्हेंबर २०२६ ● पाने - ८ ● किंमत २.०० रू.
RNI - MAHMAR/2023/87332

# उडणशाह वली दर्गाहाचा ठराव आदेश वाद ऐरणीवर

## बार कौन्सिल निवडणुकीनंतर वक्फ मंडळाच्या दोन सदस्यांवरच प्रश्नचिन्ह!

# अधिकार नसतांना ही ठरावावर स्वाक्षऱ्या?

**छत्रपती संभाजीनगर / पुणे**

**(दैनिक लोकनिष्ठ) –** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या निर्णय प्रक्रियेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलची २४ मार्च २०२६ रोजी निवडणूक पार पडली. या निवडणुकीत ॲड. सय्यद इफ्तेखार सय्यद इनायत हाश्मी (अनुक्रमांक १३५) आणि ॲड. अहमद खान उस्मान खान पठाण (अनुक्रमांक ९९) हे उमेदवार म्हणून सहभागी झाले होते, दोन्ही वक्फ सदस्यांचे बार कौन्सिलमधील प्रत्यक्ष सदस्यत्व संपुष्टात आल्याने त्यांनी वक्फच्या बैठीकीत सदस्य म्हणून उपस्थिती दर्शविलीच नव्हे तर अश्या अनेक ठरावावर हम साथ साथ है म्हणत अध्यक्षाला एकटा पडू न देता या दोन्ही कायदातज्ञ सदस्यांनी स्वाक्षरी हि केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

या ठरावांचे काय महत्व आहे आणि याचा कोणाला लाभ मिळाला व कोणाला मिळणार यावर पारदर्शकतेचा ढोंग रचणाऱ्यांनी व विकासाचे नगारे वाजणाऱ्यांनी राज्याच्या जनते समोर बाणेर मस्जिद आणि उडणशाह वली दर्गाह वक्फ मिळकतीबाबतचा खुलासा करावे अशी नागरिकांची इच्छा आहे. बाणेर मस्जिदचा ठराव क्र. २१ व सीईओचे आदेश आणि उडणशाह वली दर्गाहच्या आदेशांचीही चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.राज्य सरकार आणि उपमुख्यमंत्री, अल्पसंख्यक व औकाफ मंत्री आणि सचिवांची भूमिका काय हे महत्वाचे ठरणार आहे.

मिळालेल्या माहिती नुसार वक्फ कायदा, १९९५ मधील कलम १४(१)(ब)() नुसार राज्य बार कौन्सिलमधील मुस्लिम सदस्यांना वक्फ मंडळाच्या सदस्यत्वासाठी पात्रतेचा आधार उपलब्ध होतो. याच तरतुदीचा अर्थ स्पष्ट करताना सर्वोच्च न्यायालयाने २२ एप्रिल २०२५ रोजी मोहम्मद फिरोज अहमद खालिद विरुद्ध स्टेट ऑफ मणिपूर या प्रकरणात महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, बार कौन्सिलमधील सदस्यत्वाच्या आधारे वक्फ मंडळावर आलेल्या सदस्याचा वक्फ मंडळातील कार्यकाळ हा बार कौन्सिलमधील त्याच्या सदस्यत्वाच्या कार्यकाळाशी संलग्न आहे. बार कौन्सिलचे सदस्यत्व संपुष्टात आल्यास, कायद्यातील संबंधित अटींच्या अधीन राहून वक्फ मंडळावरील सदस्यत्वही संपुष्टात येते. त्यामुळे ॲड. सय्यद इफ्तेखार सय्यद इनायत हाश्मी आणि ॲड.अहमद खान उस्मान खान पठाण या दोन्ही वक्फ सदस्यांचे बार कौन्सिलमधील प्रत्यक्ष सदस्यत्व संपुष्टात आल्याने त्यांनी वक्फच्या बैठीकीत सदस्य म्हणून सहभाग व उपस्थित राहण्याचा अधिकार नसल्याचे सांगितले जाते.

**सर्वोच्च न्यायालयाच्या २२ एप्रिल २०२५ च्या निर्णयाचा आधार, २४ मार्च २०२६ नंतरच्या ठरावांची वैधता तपासण्याची मागणी –** या बाणेर मस्जिद आणि सदस्यत्व प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर २४ मार्च २०२६ नंतर झालेल्या राज्य वक्फ मंडळाच्या बैठकांमध्ये संबंधित सदस्य सहभागी झाले, त्यांनी थारावबाबत चर्चा/ मतदान हि केले व ठराव मंजूर हि झाले आणि सर्वोच्च न्यायालयाच्या २२ एप्रिल २०२५ च्या निर्णयाचा आधार व कायद्यानुसार यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने लक्ष देणे गरजेचे होते. २४ मार्च २०२६ नंतरच्या बैठकांमध्ये कोणते महत्त्वपूर्ण ठराव मंजूर झाले, याची तपासणी करण्याची मागणी होत आहे. विशेषतः बाणेर मस्जिदच्या जमिनीशी संबंधित दिनांक ११/०८/२०२६ रोजीचा ठराव क्रमांक २१ यामध्ये संबंधित सदस्यांची भूमिका काय होती, त्यावेळी त्यांचे सदस्यत्व कायदेशीरदृष्ट्या वैध होते का आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कोणत्या आधारावर मंजुरी दिली, हे प्रश्न उपस्थित होत आहेत.

संबंधित वक्फ सदस्य अपात्र ठरल्याचे अधिकृतरीत्या सिद्ध




झाल्यास त्यांच्या सहभागामुळे प्रभावित झालेल्या ठरावांच्या वैधतेचा शासनाने व वक्फ प्रशासनाने स्वतंत्रपणे कायदेशीर आढावा घेणे आवश्यक ठरणार आहे. सदरच्या सर्व प्रकार व माहिती नुसार दिनांक २४ मार्च २०२६ नंतरचे सर्व ठराव आपोआप अवैध ठरतात, असा निष्कर्ष लावले जात आहे .विशेष म्हणजे, या ठरावाला मंजुरी देणाऱ्या दोन सदस्यांच्या अधिकारांवर आक्षेप घेतला जात असून, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनीही या ठरावाला संमती दर्शवून स्वाक्षरी केल्याचा आरोप करण्यात येत आहे. संबंधित सदस्य व अधिकाऱ्यांनी कोणत्या कायदेशीर तरतुदींच्या आधारे हा निर्णय घेतला, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

**बाणेर मस्जिद आणि उडणशाह वली दर्गाह प्रकरण पुन्हा चर्चेत –** दैनिक 'लोकनिष्ठ'ने यापूर्वीही बाणेर मस्जिद आणि उडणशाह वली दर्गाहच्या जमिनीशी संबंधित वक्फ मंडळाच्या निर्णय प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित केले होते.बाणेर मस्जिदच्या ठराव क्रमांक २१ बाबत तसेच उडणशाह वली दर्गाहच्या ठराव आणि आदेशांबाबत कायदेशीर आक्षेप उपस्थित होत आहेत. सूत्रांची माहितीनुसार पुण्यातील बाणेर ता. हवेली सर्व्ह न. ९९/१ क्षेत्र ७ हेक्टर ७४ आर बाजार मूल्य १२०० कोटीपेक्ष जास्त या जमिनीची नोंद द बाणेर मस्जिद असे महसूल अभिलेखात असल्याचे दिसून येते .या जमिनी बाबत असे आरोप होत आहे कि, काही व्यक्तींना ही जमीन हवी आहे, ती कोणत्याही मार्गाने मग तो मार्ग चुकीचा असो किंवा भ्रष्टाचाराचा,ती बळकावण्याचा प्रयत्न करत आहे. यात सरकारी अधिकारीही सामील असून त्यांना पाठिंबा देत आहेत. मात्र, सरकारी यंत्रणा आणि वक्फ मंडळ दोघेही यात अपयशी ठरले आहेत; सन १९३४ पासून सदर जमीन बाणेर मस्जिदच्या नावाने नोंद आहे.कारण मशिदीची स्वतःची शासकीय कागदपत्रेच भक्कम पुरावा आहेत, ज्याकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही. उडणशाह वली दर्गाहच्या प्रकरणात मंत्रालयीन स्तरावरून दबाव आणला जात असल्याची माहितीही चर्चेत आहे. या प्रकरणात मंत्रालयीन स्तरावर कोणत्या अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केला, कोणत्या कारणासाठी निर्णय प्रक्रियेत सहभाग घेतला व दबाव होता आणि संबंधित जमिनीच्या व्यवहारांशी कोणाचे हितसंबंध जोडलेले आहेत का, याची पारदर्शक चौकशी होण्याची मागणी होत आहे.

**व्यावसायिकांच्या हितासाठी निर्णय घेतल्याचा संशय?** इतक्या मोठ्या बाजारमूल्याच्या वक्फ जमिनीबाबत घेतलेल्या निर्णया मुळे काही व्यावसायिकांना फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न झाला आहे का, असा संशय व्यक्त केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणात अधिकारी आणि संबंधित सदस्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात असून, ठरावामागील नेमका उद्देश काय होता, याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

**राज्य सरकार गप्प का?शासन आणि प्रशासनाने खुलासा करावा!** राज्य वक्फ मंडळातील कथित मनमानी कारभार आणि निर्णय प्रक्रियेतील अनियमिततेबाबत आता राज्य सरकारने गांभीर्याने लक्ष घालण्याची मागणी होत आहे. अल्पसंख्याक समाजाच्या धार्मिक मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेतच अशा प्रकारचे वाद निर्माण होत असतील, तर त्याची जबाबदारी निश्चित करणार कोण? राज्य वक्फ मंडळाच्या सदस्यांची पात्रता, बैठकीतील उपस्थिती, मतदानाचे अधिकार आणि मंजूर ठरावांची कायदेशीर वैधता याबाबत राज्य सरकारने स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक आहे.

संबंधित दोन्ही वकिलांच्या बार कौन्सिलमधील सदस्यत्वाची अधिकृत स्थिती जाहीर करावी. २४ मार्च २०२६ नंतरच्या बैठकींचे इतिवृत्त आणि संबंधित ठरावांची तपासणी करावी. बाणेर मस्जिद आणि उडणशाह वली दर्गाह प्रकरणातील सर्व आदेशांची स्वतंत्र कायदेशीर तपासणी करावी, अशी मागणी पुढे येत आहे. अखेर प्रश्न एकच आहे : वक्फ मंडळाचे निर्णय कायद्याच्या चौकटीत घेतले जात आहेत की सदस्यांच्या पात्रतेबाबतच प्रश्न निर्माण होत आहेत? बाणेर मस्जिदपासून उडणशाह वली दर्गाहपर्यंतच्या प्रकरणांमधील सत्य समोर येणार का? आता राज्य सरकारने मौन सोडून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडण्याची गरज आहे. आता पाहू पुढे सरकार आणि औकाफ मंत्रालय काय भूमिका मांडते ...!

# संपादकीय

## जनतेच्या पदरी फक्त आश्वासन !

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आता सुरू झाली आहे. या निवडणुकीकडे इतर राज्यांचेही लक्ष लागले आहे. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांकडून आश्वासनांची खैरात केली जाते. मात्र, जाहीरनाम्यातील आश्वासने आणि प्रत्यक्षातील अंमलबजावणी यामध्ये अनेकदा मोठी तफावत दिसून येते. त्यामुळे समाजवादी पक्षाने दिलेल्या या आश्वासनांचे भवितव्य सत्तेची संधी मिळाल्यानंतरच स्पष्ट होईल. २०२७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या जाहीरनाम्यात समाजवादी पक्षाने (एसपी) पाच वर्षात २५ लाख तरुणांना सरकारी नोकऱ्या, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी, २३ पिके आणि दुधासाठी किमान आधारभूत किंमतीची (एमएसपी) कायदेशीर हमी आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याचे आश्वासन दिले आहे. 'जनतेचा जाहीरनामा २०२७' या घोषणेअंतर्गत याला पीडीएची प्रतिज्ञा' असे नाव देण्यात आले आहे. यामध्ये रोजगार, शिक्षण, आरोग्य, महिलांची सुरक्षा आणि शेतकऱ्यांची समृद्धी यासोबतच मागास, दलित, अल्पसंख्याक आणि इतर वंचित घटकांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासावर भर दिला आहे. या जाहीरनाम्यात सर्व पात्र तरुणांना सुरक्षित नोकऱ्या, कौशल्य विकास केंद्रांमार्फत दरवर्षी ५ लाख तरुणांना प्रशिक्षण आणि रोजगार मिळेपर्यंत दरमहा ५,००० रुपयांचा पोषण भत्ता देण्याचे आश्वासन दिले आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देऊन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही दिले आहे. शिक्षण क्षेत्रात, पक्षाने २६,००० बंद प्राथमिक शाळा पुन्हा सुरू करण्याचे, इयत्ता १२वीच्या विद्यार्थ्यांना लॅपटॉप देण्याची योजना पुन्हा राबवण्याचे आणि प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये वायफाय सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे. घोषणापत्रात राज्याच्या जीडीपीच्या ६ टक्के शिक्षणावर खर्च करण्याचे आणि गरीब व दिव्यांग विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची समान संधी देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांसाठी १५,००० कोटी रुपयांचा निधी, सर्व २३ पिके आणि दुधासाठी किमान आधारभूत किमतीची कायदेशीर हमी, कर्जमाफी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना २४ तासांत पैसे देण्याचे आश्वासन आज घडीला सर्वसामान्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज आणि ग्रामीण घरगुती ग्राहकांना ३०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याचे धोरणही आवश्यक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि अत्यावश्यक सुविधांसह ''स्मार्ट गावे'' विकसित करण्यासाठी १.५ लाख कोटी रुपये वाटप करण्याचे वचन दिले आहे. सामाजिक न्यायाचा भाग म्हणून जात-आधारित जनगणना करणे, आरक्षणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आणि शासकीय सेवेतील रिक्त आरक्षित पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी १०९० आणि डायल-११२ प्रणाली मजबूत करण्याचे, महिलांवरील गुन्ह्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आणि समान संधी देण्याचे आश्वासन दिले आहे. शिवाय, आरोग्य क्षेत्रात, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना १० लाखांचा आरोग्य विमा देण्याबद्दल आणि सर्व १८ विभागांमध्ये सुपर स्पेशालिटी रुग्णालये स्थापन करण्याबद्दल पाउल उचलले जाऊ शकते. उत्तर प्रदेशातील प्रमुख शहरांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र म्हणून विकसित करणे, गावांमध्ये आणि शहरांमध्ये वायफाय झोन स्थापन करणे, तसेच शासकीय सेवा, कृषी, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात एआयचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अखेर लोकशाहीत जाहीरनामा हा केवळ मतांची बेरीज करण्याचा दस्तऐवज नसून जनतेशी केलेला विश्वासाचा करार असतो. त्यामुळे उत्तर प्रदेशातील मतदारांनी घोषणांच्या गदारोळात न अडकता आश्वासनांची व्यवहार्यता, आर्थिक तरतूद आणि मागील कामगिरी यांचा कसून विचार करणे गरजेचे आहे.

# एमएमआरडीएची नोटीस : मुसाफिरखाना मस्जिद नंतर आणखी एक मस्जिद वाद

## मुंबई विमानतळाजवळील मशीद पाडली जाणार का?

**मुंबई** – मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ बांधलेल्या एका बेकायदेशीर मशिदीवरून वाद वाढला आहे. महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडला (एमआयएएल) ही वास्तू तातडीने पाडण्याचे निर्देश दिले आहेत. एमएमआरडीएची नोटीस मशिदीच्या प्रवेशद्वारावरही लावण्यात आली आहे. भाजप नेते किरीट सोमैया यांनी दावा केला आहे की, नोटीस बजावल्याच्या एका आठवड्याच्या आत मशिदीवर कारवाई केली जाईल. दरम्यान, एआयएमआयएम नेते वारिस पठाण यांनी या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, हे द्वेष पसरवण्याचे पाऊल असल्याचे म्हटले आहे.




एमएमआरडीएच्या आदेशानुसार, मारोल येथील सीटीएस क्रमांक १४०५ मध्ये असलेल्या या मशिदीचे बांधकाम अनधिकृत असल्याचे आढळून आले आहे. बांधकामाची कायदेशीरता सिद्ध करण्यासाठी मे. अशबुल जन्नत एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्टने काही कागदपत्रे सादर केली होती. तथापि, प्राधिकरणाचे म्हणणे आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ अंतर्गत या बांधकामाला संरक्षण देण्यासाठी ही कागदपत्रे पुरेशी नाहीत.या आदेशात महाराष्ट्र सरकारच्या महसूल आणि वन विभागांनी ७ सप्टेंबर २०१० आणि १० ऑक्टोबर २०१३ रोजी जारी केलेल्या परिपत्रकांचाही उल्लेख आहे. या परिपत्रकांनुसार, आदेश प्राप्त होताच हे अनधिकृत बांधकाम हटवण्यासाठी कारवाई करण्याचे निर्देश एमआयएएलला देण्यात आले आहेत.

याव्यतिरिक्त, उप जिल्हाधिकारी आणि संबंधित अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाला केलेल्या कारवाईची माहिती देणे आवश्यक आहे. असे न केल्यास नियमांनुसार एमआयएएल विरुद्ध कायदेशीर कारवाई होऊ शकते. एआयएम आयएम नेते वारिस पठाण यांनी या प्रकरणी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, यापूर्वी मुसाफिरखाना मशिदीत नोटीस लावण्यात आली होती, त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात पोहोचले, ज्याने कारवाईला स्थगिती दिली.

वारिस पठाण म्हणाले, ''त्यांना इतकी अक्कल कशी आली आहे की ते सर्व मशिदी पाडण्यावर ठाम आहेत? तुम च्या लक्षात आले असेल की दोन दिवसांपूर्वी मुसाफिरखाना मशिदीवरही एक नोटीस लावण्यात आली होती. आम्ही न्यायालयात गेलो हे चांगले झाले. न्यायालयाने आपला आदेश दिला, स्थगिती दिली आणि सध्या पुढील कारवाई थांबवली आहे.''

ते पुढे म्हणाले, ''इथे काय प्रकरण आहे? त्यांना काय झाले आहे? तिथेही विश्वस्त म्हणत आहेत की प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. असे असूनही, एमएमआरडीए ते पाडून टाकू अशा नोटिसा बजावत आहे. तर मग, हा देश कायदा आणि संविधानाने, कायद्याच्या राज्याने, बुलडोझरने की भाजप नेत्यांच्या गैरप्रकारांनी आणि दादागिरीने चालवला जाईल? हा प्रश्न निर्माण होतो. जेव्हा प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे आणि न्यायालयात सुनावणी सुरू आहे, तेव्हा थांबा. हा द्वेष थांबला पाहिजे. आता पाहूया न्यायालय काय आदेश देते.''

दुसरीकडे, भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमैया यांनी या कारवाईचे स्वागत केले आहे. त्यांनी दावा केला आहे की, एमएमआरडीएने महाराष्ट्र सरकारच्या वतीने मुंबई विमानतळ संकुलात बांधलेली कथित बेकायदेशीर मशीद पाडण्याची नोटीस बजावली आहे. सोमैया यांच्या मते, नोटीस बजावल्याच्या एका आठवड्याच्या आत मशिदीवर कारवाई केली जाईल.

# पुणे कॉलेजबाहेर भरधाव वेगाने जाणाऱ्या टेम्पोने बस स्टॉपला धडक दिल्याने ३ विद्यार्थ्यांचा मृत्यू

**पुणे** – पुण्यातील ट्रिनिटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्चच्या बाहेर बस स्टॉपवर थांबलेल्या विद्यार्थ्यांच्या गटाला डीजेचे सामान घेऊन जाणाऱ्या भरधाव टेम्पोने धडक दिल्याने तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आणि दोघे जखमी झाले. हा अपघात बुधवारी दुपारी सुमारे २.३० वाजता येवलेवाडी परिसरातील कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ घडला.सिद्धेश राजे, विशाल दांगडे आणि मोहिनी चौधरी अशी मृतांची नावे आहेत. श्वेता तळेकर आणि सोहम घंगाळे अशी जखमी विद्यार्थ्यांची नावे आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, टेम्पो बोपदेव घाटावरून उताराकडे जात असताना तो प्रथम एका ह्युंदाई व्हेन्यू कारला धडकला. त्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि त्याने कॉलेजबाहेर रस्त्याच्या कडेला असलेल्या बस स्टॉपवर उभ्या असलेल्या विद्यार्थ्यांना धडक दिली.

जखमी झालेल्या पाचही विद्यार्थ्यांना उपचारासाठी ससून रुग्णालय, भारती रुग्णालय, वानवडी येथील रूबी हॉल क्लिनिक आणि कोंढवा येथील इनामदार रुग्णालयासह विविध रुग्णालयांमध्ये तातडीने दाखल करण्यात आले. मात्र, त्यापैकी तिघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर इतर दोघांवर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी पुरंदरमधील माळशिरस येथील रहिवासी प्रतीक मारुती चव्हाण (२२) या टेम्पो चालकाला ताब्यात घेतले आहे. त्यानंतर त्याला वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठवण्यात आले.

प्राथमिक तपासानुसार, टेम्पो भरधाव वेगाने चालवला जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले. पोलीस या अपघाताला कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचा तपास करत असून, या प्राणघातक अपघाताला कारणीभूत ठरलेल्या घटनाक्रमाची छाननी करत आहेत.

भ्रष्टाचारास वाचा फोडणारा एकमेव दैनिक
www.loknisht.in
लोकनिष्ठ
पुणे कार्यालय
संपर्क : अमजद खान
9860643044

# डीलिमिटेशन विधेयक ही तर महिला आरक्षणाच्या नावाखाली 'बोगसगिरी', पृथ्वीराज चव्हाणांनी काँग्रेसला फोडला घाम !

**सातारा –** भाजपा सरकारने रविवारी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत भूमिका मांडताना भाजपाने कोणालाही विश्वासात न घेता, मागच्या दाराने लपून छपून विधेयक आणले जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच लोकसभेची सदस्य संख्या ५४३ वरून ८५० झाली तर साखर कारखान्याच्या सभेसारखे चहा, लाडू-चिवडा खा आणि निघून जा, अशी संसदेची अवस्था होईल, अशी खोचक टीकाही त्यांनी केली.

परिसिमन करायचे असेल तर करा. परंतु, राज्यांची तुलनात्मक जागांची संख्या बदलून कोणत्याही राज्यावर अन्याय होणार असल्यास त्याला काँग्रेसचा ठाम विरोध राहील. महिला आरक्षण आणण्यासाठी डिलिमिटेशन करत असल्याचा दावा ही निव्वळ बोगसगिरी आणि खोटारडेपणा असल्याची टीकाही पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. साखर कारखान्याच्या सभेसारखे चहा, लाडू-चिवडा खा आणि निघून जा, अशी संसदेची अवस्था होईल,

डीलिमिटेशन विधेयकाला अखेर आज कॅबिनेट मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. विशेष अधिवेशनात हे विधेयक मांडण्यात येणार आहे. गेल्यावेळी काँग्रेससह इतर विरोधी पक्षाने या विधेयकाला विरोध केला होता. यावेळीही काँग्रेसचा विधेयकाला विरोध असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, त्यापूर्वीच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी डीलिमिटेशन विधेयकावरून मोठी प्रतिक्रिया दिली आहे. डीलिमिटेशनला काँग्रेसचा विरोध नाहीये. परंतु, राज्यांची




तुलनात्मक जागांची संख्या बदलण्यात येऊ नये, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे. चव्हाण यांच्या या विधानाने खळबळ उडाली आहे.

काँग्रस नेते पृथ्वीराज चव्हाण हे मीडियाशी संवाद साधत असताना बोलत होते. भाजपने अपेक्षेप्रमाणे २९ तारखेला विशेष अधिवेशन बोलावले आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन अद्याप स्थगित न केल्यामुळे दोन दिवसांत नवीन अधिवेशन बोलावता आले. त्यामुळे हे हिवाळी अधिवेशन नसून पावसाळी अधिवेशनाचाच पुढील टप्पा आहे. कोणालाही विश्वासात न घेता, मागच्या दाराने लपून-छपून परिसीमन (डिलिमिटेशन) विधेयक आणले जात आहे, असा आरोप पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

विधेयकातील नेमक्या तरतुदी पाहिल्याशिवाय अंतिम भूमिका घेता येणार नाही, मात्र काँग्रेसचा परिसीमनाला विरोध नाही. परिसीमन करायचे असेल तर नक्की करा. परंतु राज्यांची तुलनात्मक जागांची संख्या बदलू नका. जेणेकरून कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही, असे चव्हाण यांनी म्हटले.

महिला आरक्षण आणण्यासाठी डिलिमिटेशन करत आहोत'' असा जो दावा केला जात आहे, ती 'बोगसगिरी' आणि 'खोटारडेपणा' असून त्यातून सरकार थापा मारून भारताच्या जनतेची फसवणूक करत आहे, असा हल्लाही त्यांनी चढवला आहे.

यावेळी पृथ्वीराज चव्हाण यानी परिसीमनाचा ऐतिहासिक आणि घटनात्मक संदर्भ दिला. परिसीमन ही मूळ घटनेतील तरतूद असून १९५१, १९६१ आणि १९७१ च्या जनगणनेनंतर परिसीमन झाले होते. प्रत्येक जनगणनेनंतर राज्यांच्या लोकसभेतील जागांची तुलनात्मक संख्या बदलत राहिल्यास दक्षिणेकडील राज्यांवर अन्याय होईल, हे ओळखून १९७६ मध्ये इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या जनगणनेनुसार लोकसभेच्या जागांची संख्या २५ वर्षांसाठी (उदा. महाराष्ट्राच्या ४८, उत्तर प्रदेशच्या ८० जागा) गोठवण्याचा निर्णय घेतला. २००१ मध्ये हा कालावधी संपल्यानंतर पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी आणखी २५ वर्षांसाठी जागा गोठवण्याचा निर्णय कायम ठेवला, जो आता २०२६ मध्ये पूर्ण होत आहे, अशी माहिती चव्हाण यांनी दिली.

# पुण्यातील बारामतीमध्ये थार चालकाचा धुमाकूळ! वाहतूक पोलिसाला धडक, सुमारे ५० फूट फरफटत नेले

**पुणे –** महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील बारामतीमध्ये वाहतूक नियंत्रण करणाऱ्या एका पोलीस अधिकाऱ्यासोबत झालेल्या दादागिरी आणि गैरवर्तनाची घटना उघडकीस आली आहे. एका थार चालकाने पोलीस अधिकाऱ्याला धडक दिली आणि नंतर त्यांना गाडीच्या बोनेटवर काही फूट फरफटत नेले. या घटनेत पोलीस अधिकाऱ्याच्या हाताला आणि पायाला दुखापत झाल्याचे वृत्त आहे. अधिकाऱ्याला धडक दिल्यानंतर थार चालक घटनास्थळावरून पळून गेला. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना बुधवारी संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास सम्यक चौकात घडली. मिळालेल्या माहितीनुसार, वाहतूक पोलीस दत्तात्रय भोसले वाहतूक नियंत्रणाचे काम पाहत होते. तेव्हा टिंटेड काचा असलेली एक महिंद्रा थार गाडी तिथे आली. ई-चलन जारी करण्यासाठी पोलीस थार गाडीसमोर उभे राहिले आणि त्यांनी तिच्या बेकायदेशीर फॅन्सी नंबर प्लेटचा फोटो काढला.

दरम्यान, थार चालवणाऱ्या व्यक्तीने अचानक गाडीचा वेग वाढवला आणि गाडीसमोर उभ्या असलेल्या भोसले यांना चिरडले, तसेच सुमारे ५० फूट फरफटत नेले. त्यानंतर थार चालक भरधाव वेगाने घटनास्थळावरून पळून गेला. या घटनेत पोलीस कर्मचारी दत्तात्रय भोसले यांच्या हाताला आणि पायाला दुखापत झाली. सुदैवाने, यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. व्हिडिओमध्ये दिसते की, पोलीस कर्मचारी दत्तात्रय भोसले कर्तव्यावर होते.

दरम्यान, त्याने आणि इतर पोलिसांनी ई-चलनसाठी फोटो काढण्याकरिता बेकायदेशीर फॅन्सी नंबर प्लेट असलेली एक काळ्या रंगाची थार गाडी थांबवली. त्यानंतर थार चालकाने पोलिसाला गाडीखाली चिरडले आणि त्याला फरफटत नेले. थार चालक धीरज शेडगे याच्या विरोधात बारामती शहर पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न आणि शासकीय कामात अडथळा आणणे यासह गंभीर आरोपांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.



# शरद पवार त्यांच्या वाढदिवशी राजकारणातून निवृत्त होणार का?

## शरद पवार शेवटच्या क्षणापर्यंत थांबणार नाही देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया

**नागपूर –** शरद पवार त्यांच्या वाढदिवशी, १२ डिसेंबर रोजी राजकारणातून निवृत्तीची घोषणा करू शकतात. एका दैनिकात ही बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चांना जोर चढला आहे. शरद पवारांच्या निवृत्तीनंतर त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) पक्ष भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीत सामील होऊ शकतो, अशीही अटकळ बांधली जात आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या चर्चांवर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, शरद पवार शेवटच्या क्षणापर्यंत थांबणार नाहीत. ते काही ना काही करतच राहतील.

नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''मला एक गोष्ट सांगायची आहे: शरद पवार साहेबांचे आरोग्य उत्तम राहावे, ही आम्हा सर्वांची इच्छा आहे. पवार साहेब अजूनही सक्रिय आहेत. मी त्यांना जवळून पाहिले आहे. ते विविध प्रकल्पां मध्ये आणि कामांमध्ये रस घेत असतात. ते आयुष्यात कधीही थांबणार नाहीत. ते नेहमीच काहीतरी सकारात्मक करत राहतील, त्यामुळे त्यांच्या निवृत्तीची चर्चा करणे योग्य नाही असे मला वाटते.''

सूत्रांनुसार, शरद पवार यांनी राजकारणातून निवृत्त होऊन भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीत सामील व्हावे, अशी पक्षात चर्चा सुरू आहे. १२ डिसेंबर रोजी शरद पवार ८६ वर्षांचे होतील. त्यांना सहा दशकांहून अधिक राजकीय अनुभव आहे. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्र सरकारमधील मंत्रीपदासह अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत.

अशी चर्चा आहे की, जर त्यांनी या वयात भाजपमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला, तर तो त्यांच्या सध्याच्या राजकीय विचारधारेपासून



आणि भूमिकेपासून एक मोठा बदल असेल. हे टाळण्यासाठी, ते निवृत्तीचा आणि आपली म ुलगी, खासदार सुप्रिया सुळे, तसेच जयंत पाटील यांच्यासह पक्षातील इतर ज्येष्ठ नेत्यांसोबत एनडीएम ध्ये सामील होण्याच्या शक्यतेचा विचार करत आहेत.

**खासदार सुप्रिया सुळे एनडीएमध्ये सामील होण्याच्या शक्यता!** मात्र, या संदर्भात कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. वृत्तानुसार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (सपा) काही नेत्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाशीही या विषयावर चर्चा केली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी त्यांना फोन केला होता. त्या फोन कॉलदरम्यान, मोदींनी कथितरित्या म्हटले होते, ''सुप्रिया, तुम्ही विश्रांती घ्या आणि मी देशाची काळजी घेईन.'' हे विधान नंतर शरद पवार यांच्या राजकीय निवृत्तीचा संकेत म्हणून पाहिले गेले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, कोयना प्रकल्पातून मुंबईकडे पाणी वळवण्यास महायुतीच्या अनेक नेत्यांकडून होत असलेल्या विरोधावरही सविस्तर भाष्य केले. ते म्हणाले की, अनेक लोक कोणताही अभ्यास न करता या विषयावर विधाने करत आहेत. वीज निर्मितीनंतर कोयना प्रकल्पातून अंदाजे ६० टीएमसी पाणी सोडले जाते. हे पाणी कोणाच्याही कामाचे नाही आणि ते थेट समुद्रात जाते. ते म्हणाले, ''या पाण्याचा अभ्यास केला जात आहे. ते खालच्या भागातून वर आणावे लागेल. हे सोपे काम नाही. जर हे पाणी मुंबईत आणता आले, तर कोकणातील अनेक प्रकल्पांवरील ताण कमी होऊ शकतो आणि मुंबई पाण्याबाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकते.''

**कोणाचेही पाणी हिसकावून घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही – फडणवीस**

फडणवीस यांनी पुढे सांगितले की, महाराष्ट्राच्या हितासाठी पाणीटंचाई असलेल्या भागांना पाणीपुरवठा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सातारा आणि सांगलीच्या दुष्काळग्रस्त भागांनाही पाणीपुरवठा करण्यात आला आहे. कोणाचेही पाणी हिसकावून घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; उलट, जे पाणी अन्यथा समुद्रात वाहून गेले असते, त्याचा महाराष्ट्रासाठी उपयोग करण्याची योजना आहे. त्यांनी स्पष्ट केले की, अभ्यास सुरू असून किती पाणी उचलता येईल हे निश्चित करणे आवश्यक असेल. सर्व संबंधितांना विश्वासात घेतल्यानंतरच हा प्रकल्प पुढे जाईल.

---

## खासदारांची खरेदी-विक्रीचा आरोप!

# सरकारने घोडेबाजाराचा अड्डा उघडला आहे-संजय राऊत

**मुंबई –** परिसीमन विधेयकाला विरोध करताना, शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर खासदारांचा घोडेबाजार केल्याचा आरोप केला आहे. राऊत यांनी सांगितले की, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशीही संपर्क साधण्यात आला होता, परंतु ठाकरे यांचा या विधेयकाला विरोध आहे. आंध्र प्रदेश आणि झारखंडमधील दोन खासदार एजंट म्हणून वावरत आहेत. खासदारांना विकत घेण्यासाठी १५० कोटी रुपयांची बोली लावली जात आहे.

राऊत यांनी आरोप केला की, सरकारने घोडेबाजाराचे केंद्र उघडले आहे. खासदारांची खरेदी-विक्री होत असून, त्यांना १५० कोटी रुपयांना विकत घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ते म्हणाले, ''आमचा पक्ष या विधेयकाला विरोध करेल. जो कोणी खासदार या विधेयकाला पाठिंबा देईल, त्याला देशातील जनता देशद्रोही म्हणून ओळखेल. हे मतदारसंघ पुनर्रचना विधेयक राष्ट्रविरोधी आणि देशद्रोही आहे. आम्ही याच्या विरोधात आहोत.''

संजय राऊत म्हणाले की, या विधेयकावर इंडिया कोएलिशनच्या बैठकीत चर्चा होईल. जो कोणी पक्ष किंवा खासदार याचे समर्थन करेल, तो देशाच्या विरोधात काम करत असेल. संजय



राऊत म्हणाले की, जे या विधेयकाचे समर्थन करतील, त्यांना २१ व्या शतकातील सर्वात मोठे देशद्रोही म्हणून ओळखले जाईल. संजय राऊत यांनीही 'एक्स' या सोशल मीडिया साईटवर पोस्ट केली. त्यांनी लिहिले, ''आज शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आपल्यात नाहीत. प्रकृती अस्वास्थ्यामुळे शरद पवार लढण्याच्या किंवा कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेण्याच्या स्थितीत नाहीत.''

पोस्टमध्ये शरद पवार यांना टॅग करण्यात आले होते. संजय राऊत यांनी लिहिले आहे की, अन्यथा संसदेत असे भ्रष्ट, ''राष्ट्रविरोधी'' मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडण्याचे धाडस कोणातही झाले नसते. मतदारसंघ पुनर्रचना हा भाजपने देशातील जनतेकडून सत्ता हिसकावून घेण्यासाठी रचलेला एक कट आहे.

संजय राऊत यांनी आपल्या पोस्टमध्ये शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना, तसेच भाजपच्या महाराष्ट्र युनिटच्या हँडललाही टॅग केले आहे. त्यांनी लिहिले की, लोकशाहीचे समर्थन करणाऱ्या प्रत्येक देशभक्त पक्षाने संसदेत हे मतदारसंघ पुनर्रचना विधेयक फेटाळून लावले पाहिजे. काळाच्या ओघात त्यांच्या विश्वासघाताचे तपशील जरी पुसट झाले, तरी इतिहास गद्दारांची नावे नेहमीच लक्षात ठेवतो. ३० नोव्हेंबरपासून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. यामध्ये अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. या काळात सरकार महिला आरक्षणाला मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडणारे घटनादुरुस्ती विधेयक पुन्हा सादर करण्याची शक्यता आहे. लोकसभेचे अधिवेशन ३० नोव्हेंबर रोजी आणि राज्यसभेचे अधिवेशन २ डिसेंबर रोजी होणार आहे.

# रिजिजू यांच्या उपस्थितीत वक्फच्या दिवशी वंदे मातरम वाजवण्यात आले, पण मौलाना उठून उभे राहिले आणि...!

**जम्मू –** जम्मू आणि काश्मीरमध्ये वक्फ दिनानिमित्त केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्या उपस्थितीत वंदे मातरम वाजवल्याने राजकीय वाद निर्माण झाला. धार्मिक नेत्यांनी याला 'लादलेली' उपाययोजना संबोधून आक्षेप घेतला, ज्यामुळे वाद निर्माण झाला. जम्मूतील अनेक इमामांनी वंदे मातरमच्या वेळी उभे राहिल्याबद्दल कलमा पठण करून अल्लाहची माफी मागितल्यानंतर हा वाद आणखी वाढला. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी श्रीनगरमधील एसकेयूएसटी-काश्मीर येथे आयोजित वक्फ दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली. त्यांच्यासोबत जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाचे अध्यक्ष डॉ. सय्यद दरख्शान अंद्राबी, राज्यसभा खासदार सतीश पुनिया, नॅशनल कॉन्फरन्सचे खासदार मिया अल्ताफ अहमद लारवी, अनेक विद्यापीठांचे कुलगुरू तसेच अनेक इस्लामी विद्वान आणि धर्मोपदेशक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या व्हिडिओ क्लिप्सवर आलेल्या सार्वजनिक प्रतिक्रियेनंतर, समारंभाला उपस्थित असलेल्या अनेक धार्मिक विद्वानांनी आणि धर्मोपदेशकांनी जाहीरपणे माफी मागितली. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड चा हवाला देत, मुत्ताहिदा मजलिस-ए-उलेमा ने आग्रह धरला की कोणत्याही अधिकृत कार्यक्रमात हे गाणे वाजवणे कायद्याने बंधनकारक नाही. मुस्लिम वक्फ मालमत्तांची धार्मिक पवित्रता जपण्यात वक्फ बोर्ड अपयशी ठरले आहे, असे म्हणत त्यांनी वक्फ बोर्डावर टीका केली.

काश्मीरचे सर्वोच्च धर्मगुरू मीरवाईज उमर फारूक यांच्या नेतृत्वाखालील, जम्मू आणि काश्मीरमधील प्रमुख इस्लामिक संघटनांचा समूह असलेल्या मुत्ताहिदा मजलिस-ए-उलेमाने (एमएमयू) या गाण्याच्या समावेशाचा निषेध केला असून, हे 'अस्वीकार्य' असून यामुळे मुस्लिमांच्या भावनांना तीव्र धक्का पोहोचल्याचे म्हटले आहे. एमएमयूने म्हटले आहे की, मातृभूमीला दैवी दर्जा देणे हे इस्लाममधील 'तौहीद' (अल्लाहची परिपूर्ण एकेश्वरवाद/एकता) या मूलभूत तत्त्वाच्या विरोधात आहे.

मौलाना अब्दुल रशीद दाऊदी यांनी 'वंदे मातरम' वाजवताना उभे राहण्याच्या आपल्या निर्णयाचे समर्थन केले आणि सांगितले की, आता तो कायदा झाल्यामुळे उभे राहणे अनिवार्य झाले आहे. तथापि, त्यांनी असेही म्हटले की, तो सरकारी कार्यक्रम नसल्यामुळे राष्ट्रगीत गाणे आवश्यक नव्हते. मात्र, हा वाद तेव्हा वाढला, जेव्हा श्रीनगरमध्ये जम्मू-काश्मीर वक्फ बोर्डाच्या 'वक्फ दिना'च्या सोहळ्याला उपस्थित राहिलेल्या जम्मूतील इस्लामिक धर्मगुरूंनी आणि इमामांनी, कार्यक्रमादरम्यान 'वंदे मातरम' वाजवले जात असताना उभे राहिल्याबद्दल खेद व्यक्त करणारा एक व्हिडिओ माफीनामा सार्वजनिकरित्या प्रसिद्ध केला. माफी मागताना एका धर्मगुरूंनी सांगितले, ''गाणे वाजताच आम्हाला आमची चूक लक्षात आली. बाहेर आल्यानंतर, आम्ही अल्लाहशिवाय दुसऱ्या कोणाच्या सन्मानार्थ उभे राहण्याच्या गंभीर पापाबद्दल केवळ अल्लाहकडे क्षमाच मागितली नाही, तर अल्लाहवरील आणि त्याच्या एकत्ववरील आमचा विश्वास दृढ करण्यासाठी 'कलिमा शहादत'चे पठणही केले.''

आपल्या माफीनाम्यात धर्मगुरूंनी स्पष्ट केले की, अधिकृत कार्यक्रमात 'वंदे मातरम'चा समावेश असल्याची त्यांना कल्पना नव्हती. त्यांनी सांगितले की, ते केवळ सौजन्यापोटी किंवा संभ्रमामुळे उभे राहिले होते, पण त्यांनी ते गाणे



गायले नाही. तसेच, त्या गाण्यात सहभागी होणे किंवा त्याला पाठिंबा देणे हे इस्लामी तत्त्वांच्या विरोधात आहे, हेही त्यांनी मान्य केले. एमएमयूने बुधवारी जाहीर केले की, ते या प्रकरणी कायदेशीर सल्ला घेत असून अधिकाऱ्यांकडे औपचारिक निवेदन सादर करतील. त्यांचा आरोप आहे की, जम्मू आणि काश्मीरमधील सरकारी कार्यक्रम आणि शैक्षणिक संस्थांमध्ये 'वंदे मातरम' 'बळजबरीने' लादले जात आहे. या गाण्याच्या समर्थनार्थ आणि विरोधात विविध गट एकमेकांविरुद्ध मोहीम चालवत असल्याने, हा वाद आता वाढत आहे.

**जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्ड सर्वोत्तम, किरण रिजिजू यांचे मत –** जम्मू आणि काश्म ीरने आपला पहिला वक्फ दिवस साजरा केला त्यानिमित्ताने, जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाच्या अध्यक्षा आणि अशा संस्थेचे नेतृत्व करणाऱ्या पहिल्या महिला डॉ. सय्यद दरकशन अंद्राबी यांचे केंद्रीय संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी कौतुक केले. ''त्या (दरख्शन अंद्राबी) देशभरातील वक्फ बोर्डाच्या एकट्या महिला अध्यक्षा आहेत... त्या एक धाडसी महिला आहेत. एवढे काम करणे सोपे नसते'', असे किरेन रिजिजू उद्घाटनानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले. ''मी तिच्या उल्लेखनीय कार्यासाठी माझे प्रोत्साहन सुरूच ठेवीन. तिच्या उत्कृष्ट कार्यामुळे मलाही प्रोत्साहन मिळाले आहे मी तुम्हा सर्वांचे अभिनंदन करतो'', असे ते म्हणाले.

जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाच्या अध्यक्षा म्हणून दरख्शान अंद्राबी यांनी केलेल्या कामाचे कौतुक करताना, रिजिजू यांनी त्याच्या भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धतीमुळे ते देशातील सर्वोत्तम असल्याचे म्हटले. जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाने हाती घेतलेल्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना केंद्रीय मंत्री म्हणाले की, त्यांनी संसदेतही सांगितले होते की, केंद्रशासित प्रदेशातील वक्फ मालमत्तांच्या विकासासाठी जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्ड सर्वोत्तम काम करत आहे. त्यांनी डॉ. दरख्शान अंद्राबी आणि त्यांच्या टीमने पदभार स्वीकारल्यापासून केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. केंद्रीय मंत्र्यांनी जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाने हाती घेतलेली विविध कामे पूर्ण करण्यासाठी अध्यक्षा आणि त्यांच्या टीमला सर्वतोपरी पाठिंबा आणि सहाय्य दिल्याबद्दल जम्मू आणि काश्मीर प्रशासनाचे आभारही मानले.

मंत्री म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू-काश्मीरला पूर्वीच्या परिस्थितीतून बाहेर काढून ''शांतता, समृद्धी आणि विकासाच्या स्थितीत'' आणण्याचे आपले स्वप्नवत लक्ष्य ठेवले आहे. ते पुढे म्हणाले की, ''आपल्या कामातून 'विकित भारत' आणि 'विकित जम्मू-काश्मीर' हे पंतप्रधानांचे स्वप्न आहे''. रिजिजू यांनी वक्फद्वारे व्यवस्थापित हजरत खदिजा-तुल-कुब्रा महिला प्रार्थना सभागृह आणि हजरतबल दर्गा येथील नव्याने बांधलेल्या अतिथीगृहाचे उद्घाटन केले. त्यांनी हजरतबल येथील वक्फ छायाचित्र संग्रहालयाचेही उद्घाटन केले. किरेन रिजिजू यांनी काठी दरवाजा येथे बीबी हलीमा कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल टेक्नॉलॉजीचे उद्घाटन केले. जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाद्वारे चालवली जाणारी ही अशा प्रकारची पहिलीच संस्था आहे. त्यांनी बोर्डाच्या कामगिरीची प्रशंसा केली, ज्याम ध्ये माजी विद्यार्थ्यांमध्ये काश्मीर विद्यापीठातील १६ सुवर्णपदक विजेत्यांचा आणि एसकेआयएम एस सारख्या रुग्णालयांमधील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा समावेश आहे.

आधुनिक सुविधांनी युक्त अशी नवीन इम ारत ७.२३ कोटी रुपये खर्च करून विकसित करण्यात आली आहे. रिजिजू यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व सोयीसुविधांची पाहणी केली. ''जम्मू आणि काश्मीरसाठी हा एक महत्त्वाचा दिवस आहे. मी येथे अनेकदा आलो आहे, पण हा दिवस विशेष महत्त्वाचा आहे... आज उद्घाटन झालेले प्रकल्प केवळ जम्मू आणि काश्मीरमधील भाविकांसाठीच नव्हे, तर देशाच्या इतर भागांतून तसेच परदेशातून येणाऱ्यांसाठीही महत्त्वाचे आहेत. ही सर्वांसाठी आनंदाची बातमी आहे'', असे ते नर्सिंग कॉलेज आणि हजरतबल दर्गा येथे उद्घाटन झालेल्या प्रकल्पांचा उल्लेख करताना म्हणाले.

किरेन रिजिजू म्हणाले की, मदर खदीजात-उल-कुब्रा प्रार्थना सभागृहासह झालेल्या कामामुळे ते प्रभावित झाले आहेत, तसेच त्यांनी विद्यार्थ्यांचीही भेट घेतली. ''प्रार्थना सभागृह पाहून मला खूप समाधान वाटले, ज्या प्रकारे ते सुंदर बनवले आहे आणि जे लोक तिथे नमाज अदा करतील... ही आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे'', असे ते म्हणाले. हजरतबल दर्ग्याला भेट दिलेल्या मान्यवरांचे फोटो असलेले हे संग्रहालय ऐतिहासिकदृष्ट्या ही महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. नंतर, मंत्री शेर-ए-काश्मीर युनिव्हर्सिटी ऑफ द ॲग्रिकल्चरल सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी-काश्मीर, श्रीनगर येथे पहिल्यावहिल्या वक्फ दिन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. संसद सदस्य डॉ. सतीश पुनिया, मियां अल्ताफ हुसेन लारवी हे प्रमुख पाहुणे होते. कुलगुरू, प्रोफेसर नझीर अहमद गनी, वक्फ बोर्डाचे सदस्य डॉ जीएन हलीम आणि सय्यद मोहम्मद हुसैन हक्कानी, मोलवी इम्रान रझा अन्सारी, मौलाना अब्दुल रशीद दाऊदी, मौलाना फारूक नूराबादी आणि मौलाना फारूक नकशबंदी प्रेसीडियमचा भाग होते.

काश्मीर विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. निलोफर खान, एसकेआयएमएसचे संचालक डॉ. मोहम्मद अश्रफ गनी, त्रालचे आमदार रफीक नाईक आणि भाजप नेते अशोक कौल हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. या प्रसंगी जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाच्या विकास आणि परिवर्तनाच्या प्रवासावर आधारित एक माहितीपट प्रदर्शित करण्यात आला. किरेन रिजिजू यांनी डॉ. अंद्राबी आणि त्यांच्या टीमचे महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल अभिनंदन केले. ते म्हणाले, ''पंतप्रधानांच्या विकास मोहिमेच्या अनुषंगाने, जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाचे योगदान उल्लेखनीय आणि प्रेरणादायी आहे''. त्यांनी जम्मू आणि काश्मीरमध्ये एक भव्य कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यासाठी जम्मू आणि काश्मीर वक्फ बोर्डाला विशेष निधी वाटपाची घोषणा केली.

# 'भाऊ फ्लेक्स काढा' मोहीम : 'उद्या माझे नावाचे बेकायदा होर्डिंग लागले, तर...'; पुण्यातील कारवाईचे फडणवीसांकडून कौतुक

**पुणे –** पुण्यात अतिक्रमण व अवैध होर्डिंग विरोधात महापालिकेची जोरदार कारवाई सुरू केली आहे. पुणे शहराच्या प्रथम नागरिक महापौर मंजुषा नागपुरे यांना पुणे महापालिकेच्या अधिकृत ट्विट अकाऊंटवरून घरचा आहेर दिला आहे. पुणे मनपा प्रशासनाच्या रडारवर महापौर मंजुषा नागपुरेसुद्धा आल्याचे दिसून आले आहे. तर केलेल्या या कारवाईचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून महापालिका प्रशासनाचे कौतुक करण्यात आले आहे. ''बेकायदेशीर होर्डिंग वर सातत्याने कारवाई झालीच पाहिजे, उद्या माझ्या नावाचे बेकायदा होर्डिंग लागले, तर माझेही नाव तुमच्या पुरस्कारांच्या यादीत टाका'', असेही पुढे देवेंद्र फडणवीस म्हणालेत. नागपूर अधिवेशनात महापालिकेने अशीच कारवाई करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे. नेते असो कि कार्यकर्ते, ते कायम जनतेत दिसले पाहिजे, अवैध होर्डिंगवर नाही असंही मुख्यमंत्र्यांनी ठणकावून सांगितले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सोशल मिडीया एक्सवरती पोस्ट लिहून पुणे पालिकेचे कौतुक केले आहे.

पुण्यात सध्या अतिक्रमणाविरोधात आणि विशेषत: अवैध होर्डिंगविरोधात कारवाई सुरु आहे. मी पुणे महापालिका प्रशासनाचे अतिशय मनापासून कौतूक आणि अभिनंदन करतो. शहरातील पायाभूत सुविधांचा नागरिकांना योग्य वापर करता आला पाहिजे. वाहनांसाठी, पायी चालण्यासाठी जागा असल्या पाहिजेत. शेवटी नियम हे काही केवळ जीआर किंवा शासकीय दस्तावेजात प्रकाशित करण्यासाठी नसतात, ते पाळायचे सुद्धा असतात. याचा हेतू सर्वसामान्यांचे जीवन सुखकारक करणे हाच असतो. बेकायदेशीर होर्डिंग ही केवळ पुण्यात नाही, सर्वत्रच मोठी समस्या आहे.

यावर सातत्याने आणि नियमितपणे कारवाई झालीच पाहिजे. त्यातही पुण्याने जी अभिनव आणि अस्सल 'पुणेरी' धाटणीतील संकल्पना स्वीकारली, त्याचे कौतूक करावे तितके कमी आहे. पुणे प्रशासनाला मी सांगेन. उद्या माझ्या नावाचे बेकायदा होर्डिंग लागले, तर तुमच्या त्या पुरस्कारांच्या यादीत माझेही नाव जाहीर करा! आता




येणाऱ्या काळात नागपूर येथे विधिमंडळाचे अधिवेशन आहे, तेथेही आता बेकायदेशीर होर्डिंग्जचा धडाका सुरु होईल. नागपूर प्रशासनाने आतापासून जनजागृती करावी आणि शहर विद्रुप होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. नेते असोत की कार्यकर्ते, ते कायम जनतेतच दिसले पाहिजे, बेकायदा होर्डिंग्जवर नाही, अशी पोस्ट देवेंद्र फडणवीसांनी शेअर केली आहे.

पुणे शहर विद्रुपीकरणा विरोधातील मोहिमे अंतर्गत पुणे महापालिकेने २४ नोव्हेंबर रोजी अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्यांविरोधात 'भाऊ फ्लेक्स काढा' ही मोहीम सुरू केली आहे. यासाठी महापालिकेने '' हे संकेतस्थळ सुरू केले असून, या पोर्टलवर नागरिक अनधिकृत फ्लेक्सचे छायाचित्र काढून अपलोड करू शकतात. सर्वाधिक फ्लेक्स ज्यांचे आढळतील, त्यांचे नाव आणि छायाचित्र २४ तासांत संकेतस्थळावर 'विद्रुपीकरण पुरस्काराचे' मानकरी म्हणून प्रसिद्ध केले जाणार आहे. पहिल्या पुरस्काराचे मानकरी भाजपचे पदाधिकारी ठरले असून, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, नगरसेवक पृथ्वीराज सुतार आणि सुनील पांडे यांची नावे यामध्ये समाविष्ट आहेत. तर व्यावसायिक/ब्रँड्स गटामध्ये ब्रम्हप्रिया वर्ल्ड स्कूल, आर जीज बिर्याणी आणि शांतिप्रिया/शांती शिखर यांची नावे जाहीर झाली आहेत.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचे दावे करणाऱ्या राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनाच आता अनधिकृत फ्लेक्सच्या माध्यमातून पुणेकरांनी आरसा दाखवला आहे. पुणे महापालिकेच्या 'भाऊ फ्लेक्स काढा' मोहिमेला पहिल्याच दिवशी नागरिकांचा जोरदार प्रतिसाद मिळात आहे. विशेष म्हणजे, या तक्रारींमध्ये सर्वाधिक निशाणा सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या जाहिरात फलकांवर साधण्यात आला आहे. त्यामुळे शहर विद्रुपीकरणाच्या मुद्द्यावर भाजपचीच कोंडी झाल्याचे चित्र आहे.

वाढदिवस, नियुक्त्या, स्वागत, सत्कार आणि विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने शहरातील चौक, रस्ते, पदपथ, झाडे आणि सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत फ्लेक्स लावण्याची स्पर्धाच राजकीय पदाधिकाऱ्यांमध्ये सुरू असते. विशेषतः सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचे आणि पदाधिकाऱ्यांचे फ्लेक्स शहराच्या कानाकोपऱ्यात झळकत असतात. यामुळे पुण्याच्या सौंदर्याला बाधा पोहोचत असून, नागरिकांकडून वारंवार नाराजी व्यक्त केली जात होती. मात्र, कारवाईच्या नावाखाली केवळ दिखावा होत असल्याची टीकाही होत होती.

# डिलिमिटेशन बिलावर राष्ट्रवादीत दोन मतप्रवाह; नताशा आव्हाड विरोधात, डिलिमिटेशनच्या मुद्द्यावर पक्षांतर्गत मतभिन्नतेची चर्चा

**मुंबई –** डिलिमिटेशनच्या मुद्द्यावरून देशातील राजकीय वातावरण तापलेले असतानाच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही वेगळे मतप्रवाह समोर येत आहेत. एकीकडे खासदार सुप्रिया सुळे यांनी काही अटींसह डिलिमिटेशनबाबत सकारात्मक भूमिका मांडली आहे. तर दुसरीकडे, आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कन्या नताशा आव्हाड यांनी या विधेयकाला विरोध करत थेट पक्षाच्या भूमिकेवरच प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे डिलिमिटेशनच्या मुद्द्यावर पक्षांतर्गत मतभिन्नतेची चर्चा सुरू झाली आहे.

नताशा आव्हाड यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत डिलिमिटेशन विधेयकाच्या चर्चेत महिला आरक्षणाचा मुद्दा आणणे दिशाभूल करणारे असल्याचे म्हटले आहे. महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्येच मंजूर झाले होते. मग आता मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाच्या समर्थनासाठी त्याचा वापर का केला जात आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या विधेयकाच्या माध्यमातून मनमानी मतदारसंघ पुनर्रचना होऊन लोकशाहीला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे.

दुसरीकडे, जितेंद्र आव्हाड यांनी मुलीच्या मतस्वातंत्र्याचे समर्थन केले असले, तरी पक्षाची भूमिका स्पष्ट करताना सुप्रिया सुळे आणि शरद पवार यांचा निर्णय अंतिम असल्याचे सांगितले. डिलिमिटेशन ही घटनात्मक प्रक्रिया असून ती टाळता येणार नाही, असे शरद पवार यांनी अनौपचारिक चर्चेत सांगितल्याचे ही आव्हाड यांनी नमूद केले. पक्षाच्या भूमिकेला आपण बांधील असल्याचे सांगत त्यांनी डिलिमिटेशनला समर्थन देण्याची भूमिका स्पष्ट केली. मात्र, नताशा आव्हाड यांनी उपस्थित केलेले प्रश्न केवळ एका कुटुंबातील मतभेद म्हणून दुर्लक्षित करता येणार नाहीत. कारण डिलिमिटेशनच्या समर्थनामागे महिला आरक्षण आणि लोकसभेतील जागा वाढवण्याचा मुद्दा असताना, विरोधकांकडून मतदारसंघांच्या फेररचनेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे आता राष्ट्रवादीची भूमिका आणि इंडिया आघाडीतील चर्चेचा पुढील निर्णय काय असणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.






# तळवाडी येथील वेश्याव्यवसायाच्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## २ महिलांची सुटका, १२ हजार रुपयांचा माल जप्त

**छत्रपति संभाजीनगर –** कन्नड तहसीलच्या पिशोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तळवडी गावात वेश्याव्यवसायाचे एक खळबळजनक प्रकरण उघडकीस आले आहे. ग्रामीण पोलिसांच्या अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंधक शाखेने छापा टाकून या अवैध वेश्या व्यवसायाच्या अड्ड्याचा पर्दाफाश केला आहे.

छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने पिशोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तलाववाडी येथे अवैधरित्या सुरू असलेल्या देहव्यापाराचा पर्दाफाश केला. महिलांच्या आर्थिक परिस्थितीचा, अशिक्षितपणाचा आणि असहाय्यतेचा गैरफायदा घेत त्यांच्याकडून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी देहव्यापार करून घेतला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, दोघांविरुद्ध अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियम, १९५६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळावरून म ोबाईल फोन, निरोध पाकिटे असा एकूण १२,०८० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सहायक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर आणि त्यांच्या पथकाने मंगळवारी रात्री संबंधित घराभोवती सापळा रचला.या कारवाईत पोलिसांनी दोन पीडित महिलांची सुटका केली. दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी २४ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास सापळा रचला. डमी ग्राहकाच्या माध्यमातून खात्री केल्यानंतर पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला, या कारवाईदरम्यान एका पत्र्याच्य खोलीतून एका महिलेची, तर घराच्या दुसऱ्या खोलीतून आणखी एका महिलेची सुटका करण्यात आलीः महिलांच्या आर्थिक अडचणी आणि असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन त्यांच्याकडून आर्थिक फायद्यासाठी देहव्यापार करून घेतला जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी गोधाबाई छोटुराम महेर आणि गणेश छोटुराम महेर यांच्याविरुद्ध अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ मधील कलम ३, आणि १ ५ अन्वये पिशोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळावरून मोबाईल फोन आणि निरोध पाकिटे असा एकूण १२ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव आणि अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल नरवडे, पोलीस अंमलदार दिलीप साळवे, कपिल बनकर, ईशाद पठाण, भाग्यश्री चव्हाण आणि मनिषा साळवी यांनी या कारवाईत सहभाग घेतला. महिलांच्या आर्थिक असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन त्यांना देहव्यापारास प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करण्यासाठी ग्रामीण पोलीस दलाकडून विशेष लक्ष दिले जात असून, अशा प्रकारच्या अवैध कृत्यांची माहिती नागरिकांनी पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# मतदारसंघ पुनर्रचना डिलिमिटेशन बील विधेयकात नेमके काय?

**मुंबई –** केंद्र सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. या अधिवेशनात सध्या सर्वात चर्चेत असलेले आणि जोरदार विरोध असलेले मतदारसंघ पुनर्रचना म्हणजेच डिलिमिटेशन बील सादर होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत डिलिमिटेशन (सीमांकन) विधेयक आणि महिला आरक्षणाशी संबंधित घटना दुरुस्ती विधेयकाला मंजुरी देण्यात आली आहे. अशातच आता मतदारसंघांच्या पुनर्रचनेसंदर्भातील डिलिमिटेशन विधेयकाची प्रत समोर आली आहे.

देशातील लोकसभा आणि विधानसभा म तदारसंघांच्या पुनर्रचनेसंदर्भातील डिलिमिटेशन विधेयकाची प्रत समोर आली आहे. या विधेयकात सध्याच्या जागांमध्ये ५० टक्के वाढ करण्याची तरतूद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यानुसार लोकसभेच्या एकूण जागा ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावानुसार राज्यांसाठी लोकसभेच्या जागांची कमाल मर्यादा ५३० वरून ८१५ करण्यात येणार आहे. तर केंद्रशासित प्रदेशांसाठी जागांची संख्या २० वरून ३५ करण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय राज्य विधानसभांच्या सदस्यसंख्येतही वाढ करण्याची तरतूद असून, कमाल सदस्यसंख्या ५०० वरून ६५० पर्यंत नेण्याचा प्रस्ताव आहे. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के म्हणजेच एकतृतीयांश आरक्षण लागू करण्याची तरतूदही या विधेयकात करण्यात आली आहे.

नव्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर महिला आरक्षण लागू होणार असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, जागांचे वाटप आणि मतदारसंघांची रचना २०५१ पर्यंत कायम ठेवण्याची तरतूद या विधेयकात असल्याची माहिती आहे. त्यामुळे या प्रस्तावामुळे देशातील लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची रचना नव्याने होण्याची शक्यता आहे. दरम्यान, केंद्र सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले असून लोकसभेचे कामकाज ३० नोव्हेंबर २०२६ पासून आणि राज्यसभेचे कामकाज २ डिसेंबर २०२६ पासून सुरू होऊन दोन्ही सभागृहांची कार्यवाही ३ डिसेंबर २०२६ पर्यंत चालण्याची शक्यता आहे. एकीकडे काँग्रेससह इंडिया आघाडीतील पक्षांचा या विधेकायला विरोध होत आहे. अशातच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने मात्र पाठिंबा दिला आहे.

**शरद पवारांच्या पाठिंब्याने मोदी सरकारचे गणित बदलणार!** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने डिलिमिटेशन विधेयकावर एक मास्टरस्ट्रोक खेळला आहे. सरकारने विरोधी आघाडीत फूट पाडली आहे. इंडिया आघाडीचे महत्त्वाचे शरद पवार आणि त्यांच्या पक्षाला आपल्या गटात सामील करून घेतले आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संसदेत डिलिमिटेशन विधेयकाला पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी याला दुजोरा दिला आहे. शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर ते म्हणाले, घटनात्मक तरतुदींनुसार परिसीमन करणे आवश्यक आहे. सुप्रिया ताई आणि खासदारांनी ठरवले आहे की आमचा पक्ष याला पाठिंबा देईल. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) लोकसभेत आठ खासदार आहेत, तर राज्यसभेत केवळ एक खासदार आहे. लोकसभेत मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी सरकारला एकूण खासदारांपैकी दोन-तृतीयांश खासदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता असते.

५४३ सदस्यीय लोकसभेत हा आकडा ३६० आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीएकडे आधीच ३२० खासदार आहेत. शिरोमणी अकाली दल एनडीएमध्ये सामील झाल्यानंतर हा आकडा ३२१ झाला आहे. अशा परिस्थितीत, शरद पवार यांच्या पक्षाच्या सामील होण्याने लोकसभेतील त्यांचा आकडा ३२९ वर पोहोचला आहे. सरकारला आशा आहे की, एकेकाळी काँग्रेससोबत असलेला तामिळनाडूचा विरोधी पक्ष डीएमकेदेखील केंद्र सरकारला पाठिंबा देऊ शकेल. पक्षाध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनी मतदारसंघ पुनर्रचनेवरील आपली भूमिका बदललेली नाही, असे सांगून केंद्र सरकारचा तणाव वाढवला आहे. असे असूनही, डीएमकेवर शंका कायम आहे, कारण हा पक्ष काँग्रेसवर खूप नाराज आहे. लोकसभेत डीएमकेचे २२ खासदार आहेत. सरार यांनीही डीएमकेशी संपर्क साधायला सुरुवात केली आहे. जर डीएमकेने मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर सरकारला पाठिंबा दिला, तर सरकारच्या बाजूने असलेल्यांची संख्या ३५१ होईल.

सरकारची नजर आंध्र प्रदेशातील विरोधी पक्ष आणि माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआरसीपीवरही आहे, ज्याचे लोकसभेत ४ खासदार आहेत. अलीकडेच, सोनिया गांधींच्या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर, जगन मोहन रेड्डी यांनी काँग्रेस आणि गांधी घराण्यावर टीका केली. अविभाजित आंध्र प्रदेशात काँग्रेस पक्षाची पुनर्स्थापना करून त्याला पुन्हा सत्तेवर आणण्यात आपल्या वडिलांचे योगदान गांधी घराणे विसरले आहे आणि या पुस्तकात त्यांचा व त्यांच्या कार्याचा समावेश नाही, असे ते म्हणाले. भाजप वायएसआरसीपीला आपल्याकडे खेचण्यासाठी याच भावनेचा फायदा घेत असल्याचे मानले जाते. असे झाल्यास लोकसभेत एनडीएची संख्या ३५५ पर्यंत पोहोचू शकते, जी दोन-तृतीयांशच्या आकड्यापेक्षा केवळ पाचने कमी आहे. याव्यतिरिक्त भाजप प्रत्येकी एक खासदार असलेल्या तीन पक्षांवर आणि तीन अपक्ष खासदारांवरही लक्ष ठेवून आहे. जर हे सहा पक्ष एकत्र आले, तर लोकसभेतील संख्या ३६१ पर्यंत पोहोचेल. सूत्रांनुसार, लोकसभेत तीन खासदार असलेला झारखंडचा सत्ताधारी जेएमएम पक्षही देखरेखीखाली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, डिलिमि टेशन बिल मांडताना आवश्यक सहकार्य मिळावे यासाठी भाजप देशभरात प्रयत्न करत आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी शरद पवार यांच्याशी संपर्क साधला. विशेष म्हणजे, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून या बिलाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचेही वरिष्ठ सूत्रांनी सांगितले आहे. गेल्या काही दिवसांपासून डिलिमिटेशनची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरत होती. आता या चर्चेला अधिकृत स्वरूप येण्याची शक्यता दिसत आहे. सध्या शरद पवार रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी दाखल आहेत, तरीही भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून त्यांच्याशी चर्चा सुरू असल्याचे सूत्रांनी नमूद केले आहे.

# वक्फ मंडळावर पुनर्नियुक्तीसाठी मुख्यमंत्री ते मंत्री आणि सचिवांकडे साकडे

**छत्रपति संभाजीनगर/पुणे (दैनिक लोकनिष्ठ) –** सध्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे प्रशासन राजकीय दबाव खाली ठोस निर्णय घेण्यास लाचार झाल्याचे दिसून येत आहे.प्रशासकीय अधिकारी निर्णय घेणार तरी कसे निर्णय घेतला जाईल तर अनेक गोष्टी बाहेर येण्याची शक्यता नाकारता येत नाही असे सांगितले जाते. बाणेर मस्जिद आणि दर्ग्याहच्या जमीन प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर वक्फ मंडळात पुन्हा पद मिळवण्यासाठी माजी पदाधिकाऱ्यांकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा मंत्रालयात व वक्फ वर्तुळात रंगू लागली आहे. विशेष म्हणजे, या संभाव्य पुनर्नियुक्तीसाठी मुख्यमंत्री स्तरापासून मंत्री आणि वरिष्ठ सचिवांपर्यंत शिफारशी मिळवण्याचे प्रयत्न होत असल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे.

बाणेर मस्जिद–दर्गाह जमीन प्रकरणाचे सत्य समोर येणार पुनर्नियुक्तीच्या आधारावर दडपले जाणार? या कथित शिफारशींमागे नेमके कोणाचे राजकीय पाठबळ आहे? पुनर्नियुक्तीसाठी मंत्रालयात कोणत्या पातळीवर हालचाली सुरू आहेत? आणि बाणेर मस्जिद–दर्गाह जमीन प्रकरणातील निर्णयप्रक्रियेचा या प्रयत्नांशी काही संबंध आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

**बाणेर मस्जिद–दर्गा प्रकरणाची चौकशी कधी?** बाणेर मस्जिदीच्या इनामी जमिनीच्या ठराव व निर्णय दर्ग्याहच्या नावावर झालेल्या प्रक्रियेबाबत पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले जात असतांना, त्याच प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर संबंधित व्यक्तींना पुन्हा वक्फ मंडळात स्थान मिळवून देण्याचे प्रयत्न होत असल्याची चर्चा अधिकच गंभीर ठरत आहे.

**मुख्यमंत्री ते सचिवांपर्यंत शिफारशींची चर्चा!** वक्फ मंडळावर पुनर्नियुक्तीसाठी मुख्यमंत्री, संबंधित मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या स्तरावर




शिफारशी मिळवण्याचे प्रयत्न होत असल्याचा दावा सूत्रांकडून केला जात आहे.

**शासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी!** बाणेर मस्जिद जमीन प्रकरणातील ठराव, आदेश आणि मागील बैठकींचे इतिवृत्त सार्वजनिक करावे. संबंधित जमिनीच्या प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करावी. तसेच वक्फ मंडळातील संभाव्य पुनर्नियुक्ती प्रक्रियेत कोणताही राजकीय किंवा प्रशासकीय दबाव नसल्याची पारदर्शकता शासनाने दाखवावी.

बाणेर मस्जिद–दर्गाह जमीन प्रकरणाचे सत्य समोर येणार की पुनर्नियुक्तीच्या राजकीय चर्चांमध्ये हा विषय बाजूला पडणार? मुख्यमंत्री कार्यालय, अल्पसंख्याक व औकाफ मंत्रालय आणि वक्फ प्रशासन या प्रश्नांवर काय भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**बैठकीचे इतिवृत्त प्रकरणात तीन वर्षांचा हिशेब कोण देणार? वक्फ मंडळाच्या सीईओंच्या कारवाईकडे लक्ष! सत्य बाहेर येणार की प्रकरण दडपले जाणार?**

तीन वर्षांपासून बैठकीचे इतिवृत्त शासकीय संकेतस्थळावर अपलोड नाही; संबंधित विभाग प्रमुखांवर कारवाई का नाही? वक्फ मंडळाच्या सीईओंच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वक्फ मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त तयार करून ते शासकीय संकेतस्थळावर अपलोड करण्याची जबाबदारी असलेल्या संबंधित बैठक विभाग प्रमुखांनी तब्बल तीन वर्षांपासून इतिवृत्त अपलोड केले नसल्याचा स्पष्ट दिसून येत आहे.

मग इतिवृत्त अपलोड न करण्यामागचे नेमके कारण काय? संबंधित बैठक विभाग अधिकाऱ्यांकडून खुलासा का मागवण्यात आला नाही? नियमांचे उल्लंघन झाले असल्यास निलंबनासह शिस्तभंगाची कारवाई का करण्यात आली नाही?

सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न करण्यामागे नेमके कोणाचे हितसंबंध आहेत ? की या प्रकरणात प्रशासकीय पातळीवरच दुर्लक्ष केले जात आहे?

बैठकीचे इतिवृत्त आणि प्रशासकीय निर्णय सार्वजनिक झाले पाहिजेत.वक्फ मंडळाचे सीईओ आता तरी या प्रकरणाची गंभीर दखल घेणार का? तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या इतिवृत्ताचा प्रश्न मार्गी लावून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रश्न एकच वारंवार उपस्थित केला जात आहे की, सत्य बाहेर येणार की प्रशासकीय दिरंगाईच्या पडद्याआड हा संपूर्ण प्रकार दडपला जाणार?आता वक्फ मंडळाच्या सीईओंनी मौन सोडून ठोस भूमिका घेण्याची वेळ आली आहे!


9370987123/9860643044
Deccan Darbar
Restaurant & Cafe
Indian I Mughlai I Chinese I Arabic Special

Kausar Baugh, NIBM Kondhwa, Pune - 48. ddarbarpune@gmail.com

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **युनूस खान** यांनी माइलस्टोन मिडिया, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर–४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय लोकनिष्ठ, ६१ जीएम प्लाझा, आरटीओ ऑफीसच्या बाजुला, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर–४३१००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. संपादक : **युनूस खान**, मो. क्र. **9890190231**, RNI - MAHMAR/2023/87332